**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र. –०१</u>** **<u>नि.फौ.ख.क्र.२३/२०११</u>**

**सरकार विरुध्द सुधीर**

**मी शपथपूर्वक खरे सांगतो की** **निशाणी – ०९**

**माझे नांव – धिरज चंद्रमणी पौनीकर**
**वय – अंदाजे ३४ वर्ष, व्यवसाय – हातमजूरी**
**राहणार – आवंडी, ता. कामठी, जि. नागपूर**

**सरतपास सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती जी.ओ. वर्मा यांच्या कडून –**

मी आरोपींना ओळखतो. मी फिर्यादी चंद्रकला यांना ओळखत नाही. दिनांक १६/०२/२०११ रोजी पोलीसांनी मला कडोली रोड वर बोलाविले होते. माझ्या कडे पोलीसांनी विचारपूस केली होती. माझ्या समक्ष पोलीसांनी काहीही कारवाई केली नाही. पोलीसांनी माझ्या समक्ष काहीही जप्त केले नाही. मला आता दिनांक १६/०२/२०११ रोजीची आरोपी संजय येंडे या आरोपीचे निवेदन दाखविले. ते माझे समक्ष घेतले नाही. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर माहिती नाही. निवेदनास सहीपुरती **<u>निशाणी १०</u>** देण्यात येते. मला आता त्याच दिवशीचा जप्ती पंचनामा दाखविण्यात आला, त्यावर अनुक्रमांक २ कडे माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहिती नाही. जप्ती पंचनाम्यास सहीपुरती **<u>निशाणी ११</u>** देण्यात येते.

**( साक्षीदार हा त्याच्या पूर्वीच्या जबाबाप्रमाणे कथन करीत नसल्यामुळे त्यास सहाय्यक सरकारी अभियोक्तांनी सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली. )**

हे म्हणणे खरे नाही की आरोपी संजय येंडे याने माझे समक्ष निवेदन दिले होते की त्याने ज्या चाकूने मारले आहे तो चाकू घरी लपवून ठेवला आहे. हे म्हणणे खरे नाही की त्याने सांगितल्या प्रमाणे आरोपी दाखवेल त्या घरी गेलो. हे म्हणणे खरे नाही की घराच्या कवेलू मधून आरोपीने माझ्या समक्ष चाकू काढून दिला. हे म्हणणे खरे नाही की त्याचा निवेदन व जप्ती पंचनामा माझ्या समक्ष तयार करण्यात आला व त्यावर मी वाचून सही केली. हे म्हणणे खरे नाही की आरोपीं माझ्या ओळखीचे असल्यामुळे त्यांना वाचविण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री. रामटेके यांच्या मार्फत सुरु –**

नाकारला

वा.दा.ब.अ.क.के.
समक्ष

**स्वाक्षरी/–**
( मोहन रा. कामत )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्या.क्र.१, कामठी

कामठी
दिनांक ०३/०९/२०२४